# दलित अत्याचार, लाँग मार्च आणि खर्डा संसद

डॉ. नितीश नवसागरे




**नितीन आगेच्या निर्घृण हत्येनंतर दलित आदिवासी अधिकार आंदोलन व इतर समविचारी संघटनांनी जातीअंताचा संदेश घेऊन समता आणि न्यायासाठी पुणे ते खर्डा 'लाँग मार्च' आयोजित केला होता. पुण्याहून २२ मे रोजी महात्मा फुले वाड्यापासून निघालेला हा मार्च २८ मार्च रोजी खर्ड्याला पोचला आणि त्याच दिवशी तिथे 'खर्डा ससंद' भरवण्यात आली. पुण्याहून थेऊर, यवत, पाटस, दौंड, श्रीगोंदा, जामखेड या मार्गाने मधल्या इतर अनेक गावांना भेट देत, त्या भागातील दलितांचे प्रश्न समजून घेत, जातीअंताचा संदेश देत अनेक कार्यकर्ते या मार्चमध्ये सामील झाले होते. या संपूर्ण प्रवासाचा आणि प्रवासादरम्यानच्या काही लक्षणीय अनुभवांचा हा वृत्तांत**

### खर्ड्याला भेट

२८ एप्रिल २०१४ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील खर्डा या गावामध्ये १७ वर्षीय नितीन आगेचा खून करून त्याला झाडावर लटकवण्यात आले. ही बातमी वृत्तपत्रांमध्ये व नंतर प्रसारमाध्यमांमध्ये चर्चिली गेली. दलित अत्याचाराच्या अनेक घटना रोजच कार्यकर्ते सांगत असतात. परंतु खर्डा गावातील ही घटना अत्याचाराची भयानकता समोर आणत होती. दलित आदिवासी अधिकार आंदोलाची सत्यशोधन समिती स्थापन करून मी, केशव वाघमारे, सुनिता भोसले, रवी बनसोडे, सुविद्य यांनी खर्डा या गावी भेट दिली. पुण्याहून किरण मोघे, डॉ. संजय दाभाडे, सुभाष थोरात, प्रा. मनोहर जाधव, प्रा. मेहबूब शेख, कॅ. अनंत लोखंडे ही टीमसुद्धा त्याच दिवशी तिथे पोहोचली. बीडवरून दलित आदिवासी अधिकार आंदोलनाचे अशोक तांगडे, मनीषा तोकले व इतर मंडळी आम्हाला येऊन सामील झाली. खर्डा हे गाव नगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यामध्ये. पश्चिम महाराष्ट्राची वेस. पुढे मराठवाडा सुरू होतो. गाव ऐतिहासिक. खर्ड्याची पेशवेकालीन लढाई प्रसिद्ध आहे. गावाच्या एक-दीड किलोमीटर अलिकडेच ग्रामपंचायतीच्या जागेमध्ये एक पत्र्याचं घर आहे. त्या घराजवळ एक पोलिस व्हॅन होती व काही माणसांची गर्दी. जामखेडचे अरुण जाधव आम्हाला सोबत करत होते. त्यांनी सांगितले की हेच नितीन आगेचं घर. दहा बाय दहाची पत्र्याची खोली. खोलीबाहेर लिंबाचं झाड. त्या झाडाच्या सावलीमध्ये नितीन आगेचे आई-वडील बसलेले. त्यांच्या आजूबाजूला अनेक शहरांमधून आलेले कार्यकर्ते नितीन आगेचे वडील राजू आगे यांना भेटल्यानंतर त्यांनी सर्व हकीकत सांगितली. राजू आगेचं कुटुंब या गावामध्ये स्थलांतरित झालेलं. मूळचे बीड जिल्ह्यातील. राजू आगे ऊसतोडणी कामगार. त्याच्यामुळे मुलाच्या शिक्षणाची हेळसांड होत होती. म्हणून गाव सोडून खर्डा गावामध्ये स्थायिक झाले. ग्रामपंचायतीच्या जागेवर पत्र्याची शेड बांधली. राजू आगे खडी मशीनवर काम करतात. दिवसाला १००-१५० रुपये मिळतात. तीन मुली व एक मुलगा (नितीन). दोन मुलींचे लग्न झाले आहे. नितीन ११ वीची परीक्षा पास होऊन नुकताच १२ वी मध्ये गेला होता. धाकटी बहीण ८ वी मध्ये आहे. नितीन गावातील रयत शिक्षण संस्थेच्या शाळेमध्ये शिकत होता. शाळेमध्ये परीक्षेनंतर आता उन्हाळी वर्ग सुरू झाले होते. नितीन उन्हाळी वर्गाला जात होता. नितीनची आई सांगत होती, नितीन शाळा संपल्यावर गावामध्ये गॅरेजमध्ये काम शिकायला जात होता. घटना घडल्याच्या आदल्या रात्री नितीनने त्याच्या आईला सांगितले की, 'गोलेकरांची मुलगी त्याच्याच शाळेमध्ये दहावीत शिकते. त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करते व

जवळ येऊन बसते.' त्यावर आईने सांगितले, 'मुलगी जवळ आली तर चारचौघांमध्ये जाऊन बस.' राजू आगे सांगत होते की २८ तारखेला सकाळी नितीन शाळेत गेला. सकाळी ८ वाजता त्याला वर्गातून मारत बाहेर आणले. त्यावर शाळेच्या मास्तराने म्हटले, 'बाहेर जाऊन भांडण करा. इथे मारू नका.' नितीनला मारत गावामधून घेऊन गेले. त्याला मुलीचा मामा येवले याच्या वीटभट्टीवर घेऊन गेले. तेथे त्याला मारहाण करण्यात आली. चटके देण्यात आले व नंतर त्याचा गळा दाबून खून करण्यात आला. त्याला मारून टाकल्यानंतर गावाच्या जवळ असणाऱ्या जंगलामध्ये नेऊन एका लिंबाच्या झाडाला लटकवून दिले. प्रयत्न होता की आत्महत्या दिसावी म्हणून. नितीनला १२.३० च्या सुमारास लटकवले असावे. त्याचे आई-वडील सकाळी १०.३० पासून त्याचा शोध घेत होते. गावामध्ये विचारले, वीटभट्टीवर विचारले, परंतु स्पष्ट उत्तर कोणीच देत नव्हते. शेवटी ३.३० च्या दरम्यान राजू आगेला मुलाचे प्रेत जंगलामध्ये लिंबाच्या झाडाला लटकवेलेले दिसले. पोस्टमार्टेम झाले. नंतर एफआयआर दाखल झाला. पोलिसांनी आरोपींना रात्रीच अटक केली.

आम्ही शाळेमध्ये मुख्याध्यापकांकडे विचारपूस केल्यावर त्यांनी सांगितले की नितीन त्या दिवशी शाळेमध्ये आलाच नव्हता. तो त्या मुलीबरोबर शाळेच्या मागे होता. त्याला मारत आरोपी शाळेच्या पटांगणातून घेऊन गेले. त्यांना 'इथे गोंधळ करू नका' असे म्हटल्याचे त्यांनी कबूल केले. नितीनला शाळेतून घेऊन गेले की शाळेच्या पटांगणातून? शिक्षकांचा गोंधळ होत असल्याचे निदर्शनास आले. परंतु त्यांनी जबाबदारी झटकून त्यांना शाळेच्या परिसराबाहेर काढले. शिक्षकांनी त्यात थोडे लक्ष दिले असते तर नितीन वाचला असता. नंतर आम्हाला कळले की शाळेच्या लोकल बॉडीचे चेअरमन गोलेकर आहेत. पुढे पोलिस स्टेशनला गेलो. पोलिस स्टेशनमध्ये पीआय संजय पाटील व तपास अधिकारी डीवायएसपी धीरज पाटील आले होते. त्यांनी सांगितले, तपास योग्य दिशेने चालू आहे. त्यांना विचारलं, 'मुलीचं स्टेटमेंट घेतलं का?' तर उत्तर, 'तपास चालू आहे. जास्त डीटेल्स देता येणार नाहीत.' 'नितीनच्या आई-वडिलांचे स्टेटमेंट घेतलं का?' 'अजून नाही.' म्हटलं, 'घटना होऊन आता एक आठवडा झाला तरी त्यांचा जबाब घेतला नाही?' उत्तर तेच, 'तपास योग्य दिशेने चालू आहे.' गावातील काही दलित भेटले. त्यांनी सांगितले, गावात गोलेकरांची दहशत. गावाच्या राजकारणात दबदबा. राष्ट्रवादी काँग्रेसशी सलगी. आगे कुटुंब समाजामध्ये जास्त येत नव्हतं म्हणून असं घडलं. नाहीतर त्यांची हिंमत झाली नसती असं करायची. आगे कुटुंब स्थलांतरित. गावात वस्तीमध्ये फुकटात राहण्यासाठी जागा मिळणे अशक्य म्हणून गावाच्या वेशीवर ग्रामपंचायतीच्या जागेवर अतिक्रमण करून पत्र्याची शेड घातलेली. तिथून एक-दीड किलोमीटरवर गाव व त्याच्यापुढे बौद्ध वस्ती. म्हणून गावातील दलितांशी संबंध येण्याची संधी कमी. एक दिवस जरी काम नाही केलं तर राजू आगेच्या घरची चूल नाही पेटणार, अशी स्थिती. मग लोकांना भेटण्याची संधी कमीच.

**लाँग मार्चची कल्पना**

खर्ड्याहून परत आल्यानंतर पुणे विद्यापीठामध्ये देवकुमार अहिरे व इतर विद्यार्थ्यांनी एक बैठक ठेवली होती त्यास बोलवले. ५०-६० एम.फिल., पीएचडी, पी.जी. करणारी मुले-मुली. वृत्तपत्रांमधील बातम्या वाचून अस्वस्थ झालेली. त्यांच्याशी झालेल्या प्रकारांबद्दल बोलत होतो. काही प्रतिक्रिया उमटल्या. मोर्चा काढू या, निदर्शने करू या. एक जण म्हणाला, 'त्यांना पँथर स्टाईलने उत्तर दिले पाहिजे. दगडफेक करु या!' म्हटलं याने काय होणार? दगडफेक करणाऱ्यांवरती पोलिस केसेस. मूळ मुद्दा बाजूला राहून तुमच्या जमानती कराव्या लागतील. तुमच्या मोर्चा व निदर्शनांनी या सरकारवर काही परिणाम होतो का? समाजावर काही परिणाम होतो का? या प्रश्नांची उत्तरे कोणाकडे नव्हती. परंतु अस्वस्थता, चीड मात्र सर्वांमध्ये निश्चित होती. संध्याकाळी केशव





वाघमारे भेटले व म्हणाले, 'एफटीआय, रानडे इन्स्टिट्यूट ऑफ जर्नालिझमच्या मुलांनी बैठक बोलवली होती. त्याला जाऊन आलो. मुलांमध्ये राग व अस्वस्थता आहे. एक चांगला परिसंवाद घ्यावा, जातीय अत्याचारांची चांगली प्रसिद्धी करावी असा प्रस्ताव आहे. म्हटलं, जातीय अत्याचार होतात हे काय लोकांना माहीत नाही का? त्याचं सोशल आऊटपुट काय?' ग्रामीण भागामधील दलित, आदिवासी असुरक्षित आहे. अनेक वर्षांपासून दलित आदिवासींचे प्रश्न राजकीय पक्षांनी चर्चिलेसुद्धा नाहीत. त्यांना आत्मविश्वास देणे गरजेचे आहे. नितीन आगेच्या कुटुंबाला हिंमत देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात काम करणाऱ्या एकट्या दुकट्या कार्यकर्त्याला विश्वास देणे गरजेचे आहे. हे सर्व होईल जेव्हा आपण सर्व लोक तिथे जाऊ जिथे घटना घडली. मग ठरले. पुण्यातील सर्व समविचारी संघटना, व्यक्तींना, मित्रांना फोन केला व 'माणुसकी'ला बैठकीला बोलवले. सर्व हकीकत सांगितली व तिथे ठरले की पुणे ते खर्डा लाँग मार्च' काढायचा. चालत २३० किलोमीटर जायचं खर्डा गावाला व तेथे खर्डा संसद घ्यायची.

लाँग मार्चच्या तयारीसाठी पुण्यातील सर्व मित्र, दलित आदिवासी अधिकार आंदोलनाचे कार्यकर्ते, समविचारी संघटना, विद्यार्थी यांची बैठका बोलवल्या. किरण मोघे, कॉ. मिलिंद सहस्रबुद्धे, डॉ. संजय दाभाडे, एफटीआय व रानडे इन्स्टिट्यूटची मुले 'लॉग मार्च'मध्ये पायी चालण्यास तयार झाली. दलित आदिवासींमधील आंदोलनाचे कार्यकर्ते होतेच. लाँग मार्चचे नेतृत्व मी, प्रियदर्शी तेलंग, केशव वाघमारे व डॉ. संजय दाभाडे यांनी करायचं ठरलं. पुण्यातील महात्मा फुले वाडा येथून लाँग मार्च सुरू करायचा व खर्डा येथे संसद घेऊन २८ मे २०१४ रोजी समारोप करायचा असं ठरलं. निखिल गायकवाडने पुण्यामधल्या सर्व आंबेडकर जयंती मंडळांशी संपर्क साधायला सुरुवात केली. त्यांच्या बैठका घेतल्या. विलास वाघ, भाई वैद्य, वसंत साळवे, बाबा आढाव, विद्या बाळ, शमसुद्दीन तांबोळी, सुभाष वारे, हमीद दाभोलकर, नितीन पवार, गीताली, रझिया पटेल, प्रकाश आंबेडकर, सी. पी. थोरात, डॉ. सिद्धार्थ धेंडे व इतर प्रमुख व्यक्तींशी संपर्क साधला. लाँग मार्चची संकल्पना समजावून सांगितली. अनेकांनी पाठिंबा दिला. सहकार्य केले. मार्गदर्शन दिले. प्रियदर्शी तेलंग आणि मी ठरवलेल्या मार्गाने सर्व गावांमध्ये भेट दिली व तिथे कार्यकर्त्यांवर जेवण, राहणे व बैठकीची जबाबदारी दिली. खर्ड्याला सभेची जबाबदारी लोक अधिकार आंदोलनाचे अरुण जाधव यांच्यावर सोपवली. या मार्गावर दोन वेळेस दौरा केला. कार्यकर्ते व जबाबदारी निश्चित करण्यासाठी काही गावांमध्ये कोणी भेटले नव्हते. परंतु आजूबाजूच्या गावातील कार्यकर्त्यांनी या गावांची जबाबदारी घेतली. जामखेडला प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक अरुण जाधवला लावण्यास सांगितले. त्या बैठकीस मी, केशव वाघमारे पुण्यावरून गेलो. कबीरदास कांबळे गेवराईतून तर युवराज सोनवणे बीडवरून आला होता. जामखेडमधील आंबेडकरी चळवळीतील व परिवर्तनवादी चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते अरुणने तिथे बोलवले होते. कार्यकर्त्यांनी सांगितले, १० मे २०१४ रोजी मराठा संघटनांनी जामखेड येथे प्रतिमोर्चा काढला हाता. नितीन आगेच्या खुनाला जातीय रूप देऊ नका. हा ब्राह्मणी कावा आहे. मराठा समाजाला टारगेट केलं जात आहे, असा सूर होता. काही कार्यकर्ते म्हणाले, 'सर्व मराठा समाजाने एक बैठकीत पैसे जमा केले. गोलेकर कुटुंबाला देण्यासाठी.' अशा बातम्या तपासून पाहता येत नाहीत. परंतु वातावरणामध्ये तणाव जाणवत होता. प्रतिमोर्चाने कार्यकर्ते चिडले होते. तसेच दलित पुढारी कोणतीही राजकीय भूमिका घेत नाहीत म्हणून हतबलही होते. आर. आर. पाटील येऊन गेले. आगे कुटुंबाला ५ लाख रुपये राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे दिले असंही सांगितले. परंतु मराठी समाजाच्या प्रतिमोर्चाला आर. आर. पाटलांचीच फूस आहे, अशीही पुष्टी कार्यकर्त्यांनी केली. एक कार्यकर्ता म्हणाले,

'आम्ही देतो ५ लाख रुपये. पाटलांना सांगा, द्याल का तुमचा एक मुलगा? राजू आगेचं नुकसान पैशाने भरून निघणार आहे का?' राजू आगे मला मागच्या भेटीमध्ये म्हणाला होता, 'साहेब मला पैसा नको, काय करू आता हा पैसा? ज्याच्यासाठी कमवायचा तो तर गेला. मला फक्त न्याय मिळवून द्या. आरोपींना शिक्षा झाली पाहिजे.' मिळवून देतील आर. आर. पाटील राजू आगेला न्याय?' जामखेडची बैठक संपवून मी, अरुण जाधव, केशव वाघमारे, कबीरदास कांबळे व युवराज खर्ड्याला गेलो. खर्डा जामखेडपासून २२ कि.मी. अंतरावर. सर्वप्रथम राजू आगेच्या घरी गेलो. राजू आगे डी.वाय.एस.पी.ला भेटण्यासाठी कर्जतला गेले होते. नितीनची आई घरी होती. त्यांना विचारलं, 'तुमचा जबाब घेतला का पोलिसांनी?' उत्तर मिळाले, 'हो.' 'पुढे काय म्हणतात पोलीस?' 'तपास चालू आहे.' म्हटलं, 'सरकारची काही मदत?' त्यावर नितीनची आई म्हणाली, 'साहेब एकुलता एक मुलगा गेला. पैसा काय करू? न्याय पाहिजे.' आम्ही सर्वजण स्तब्ध. त्यांना लाँग मार्च व खर्डामध्ये होणाऱ्या कार्यक्रमाची कल्पना दिली. त्यांची रजा घेऊन गावामध्ये गेलो. गावाची लोकसंख्या १६ हजारच्या आसपास. गावामध्ये तशी बरीच सुबत्ता होती. कार्यक्रम खर्डा किल्लाच्या समोर पटांगणात घेण्याचं ठरलं. खर्डा किल्लाच्या समोर एका ब्राह्मण कुटुंबाची इनामी मोकळी जमीन आहे. त्यांच्याशी बोलणे झाले. त्यांनी एक रुपया भाड्यावर जागा आम्हांला दिली. सामाजिक कामासाठी भाडं घेत नाही असं ते म्हणाले.

पोलिस परवानगीची जबाबदारी अरुणने घेतली. स्टेज व इतर लावण्याची जबाबदारीसुद्धा अरुणने घेतली. कबीरदास व युवराज सोनवणे यांना गावाच्या २०-२५ कि.मी. परिसरातील सर्व गाव पिंजून काढण्याची जबाबदारी दिली. सर्वाधिक लोक परिसरामधून येणार. त्यांच्याशी व्यवस्थित संपर्क साधला गेला पाहिजे. बीड व उस्मानाबाद हे शेजारील जिल्हे. येथून सर्वात जास्त लोक आले पाहिजेत. अशोक तांगडे यांना बीड व उस्मानाबाद जिल्हा पिंजून काढण्याची जबाबदारी दिली.

पुण्यामध्ये लाँग मार्चचे माहितीपत्रक व मार्ग छापून आले होते. पत्रकार परिषद घेतली. लाँग मार्चची माहिती दिली. पत्रकार परिषदेमध्ये कॉ. कुमार शिराळकर भेटले. लाँग मार्चमध्ये सामील होणार असे आम्हाला सांगितले. पुण्यामध्ये फ्लेक्स लावले, बैठका घेतल्या. फेसबुक पेज तयार केले. व्हॉटसअॅपवर मेसेजेस टाकले. लाँग मार्च विषयी संपूर्ण राज्यामध्ये चर्चा सुरू झाली. प्रियदर्शिनी तेलंग यांनी आय.जी. ऑफिस मुंबई मधून लाँग मार्च मार्ग व बैठकांची परवानगी घेतली. निखिल गायकवाड यांनी पुणे कमिशनर

व पुणे ग्रामीण यांची परवानगी घेतली. पुण्यामध्ये २२ तारखेला ३ बैठका होत्या. सकाळी ८ वाजता महात्मा फुले वाडा, सकाळी १० वाजता आंबेडकर पुतळा व दुपारी हडपसर येथे. कॉ. अनंत लोखंडे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील मार्गांची व बैठकांची परवानगी घेतली. दोन १७ सिटर गाड्या संपूर्ण लाँग मार्चच्या दरम्यान सोबत ठेवल्या. हायवेला व माळरान जिथे असेल तिथे गाडीने अंतर कापू असं ठरलं.

**लाँग मार्चची सुरुवात**

२२ मे २०१४ रोजी सकाळी ६.३० वाजता आम्ही सर्व कार्यकर्ते गंज पेठेत महात्मा फुले वाड्यामध्ये जमलो. नीरज जैन, विद्या बाळ, गीताली, मुकुंद, शमसुद्दीन तांबोळी, रझिया पटेल, सी. पी. थोरात, नितीन पवार, बाबा आढाव, अनंत दीक्षित, डॉ. सिद्धार्थ धेंडे, कॉ. अशोक दवणे, क्रॉ. अजित अभ्यंकर, वसंत साळवे, समता सैनिक दलाचे अनेक कार्यकर्ते तसेच पुणे व परिसरामधून आलेले शेकडो कार्यकर्ते व नागरिक समता भूमीमध्ये जमा झाले. बघता बघता संपूर्ण परिसर भरून गेला. बाबा आढावांनी महात्मा फुलेंचा अखंड घेतला. रझिया पटेलांनी मनोगत व्यक्त केलं. फुले दांपत्याच्या पुतळ्याला हार घातला व रझिया पटेलांनी झेंडा दाखवून लाँग मार्चची सुरुवात केली. गंज पेठेतून निघालेला लॉग मार्च घोषणा देत, हातात फलक घेत निघाला. बघता बघता शेकडो नागरिक लाँग मार्चमध्ये सहभागी झाले. विविध भागातून आलेले नागरिक, सर्व स्तरातील नागरिक जातीय अत्याचाराविरोधामध्ये आमच्यासोबत चालत होते. घोषणा दिल्या गेल्या, 'एकच लक्ष्य - जातिअंत', 'बोल दलित हल्लाबोल, जातीयवादपर हल्लाबोल', 'बोल श्रमिका हल्लाबोल', 'नितीन आगेला न्याय मिळालाच पाहिजे.' पुण्याचे रस्ते घोषणांनी दुमदुमून गेले. पायी चालत हा लाँग मार्च डॉ. आंबेडकर पुतळा, ससून रोड येथे १० वाजता पोहोचला. येथे लोकायतच्या कार्यकर्त्यांनी व इतर युवकांनी क्रांतीचे गीते गायली. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला हार घालून पुण्यातील पहिल्या निषेध सभेला सुरुवात झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे होते. सभेमध्ये अनेक मान्यवरांची भाषणे झाली. महाराष्ट्रामध्ये घडणाऱ्या जातीय अत्याचाराचा व सरकारच्या निष्क्रियेचा निषेध करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात डॉ. रावसाहेब कसबे म्हणाले, 'अनेक वर्षे चळवळीमध्ये काहीच घडत नव्हतं. तुम्ही तरुण मुलांनी लाँग मार्च काढलात, मला भविष्याची आशा वाटत आहे. याच्यातून निश्चित काही घडेल हा विश्वास आहे. तुम्ही म्हणाला तेथे तुमच्यासोबत येण्याची माझी तयारी आहे.'

लाँग मार्चसाठी पैशाची आवश्यकता होती. आम्ही लोकांना आर्थिक मदतीसाठी आवाहन केले. लोकांनी स्वयंस्फूर्तीने मदत केली. अनेकांनी कार्यक्रमाच्या दिवशी आम्हाला मदत केली. काहींनी बँकेमार्फत पैसे पाठवले. आंबेडकर पुतळ्यापासून लाँग मार्च पुढे निघाला हडपसरकडे. हडपसर गावामध्ये मोरे वस्तीमध्ये आमचा दुपारचा मुक्काम होता. तिथले सर्व नियोजन दिगंबर माने यांनी केले होते. वस्तीमध्ये एका मोकळ्या जागेत आमचा मुक्काम. वस्तीतील बायकांनी प्रत्येकीने घरून स्वयंपाक तयार करून आणला होता. प्रत्येक घरामधून जेवण आले होते. येथे किरणताई मोघे आणि जनवादी महिला संघटनेच्या २०-२५ महिला येऊन सामील झाल्या होत्या. लाँग मार्चचे प्रयोजन, वाढणाऱ्या अत्याचारांचे स्वरूप, २८ मे रोजी होणारी खर्डा संसद याबद्दल माहिती दिली व पुढे लोणी काळभोरकडे आम्ही निघालो.

**लोणी काळभोर**

२२ तारखेचा मुक्काम लोणी काळभोरला होता. संध्याकाळी ६ च्या दरम्यान आम्ही लोणी काळभोरला पोहोचलो. गावातून फेरफटका मारून दलित वस्तीमध्ये गेलो. आमची व्यवस्था दत्तात्रय कांबळे यांनी केली होती. कांबळे यांचं टू व्हीलरचे गॅरेज. व्यवसायाने मेकॅनिक. त्यांनी सर्व जबाबदारी घेतली. त्या दिवशी वस्तीमधील दोन घरांमध्ये लग्न होते व लग्नासाठी सगळे लोक वस्तीबाहेर गावी गेले होते. वस्तीत कोणीच नव्हते. दत्तात्रय कांबळे आमच्यासाठी थांबले होते. त्यांच्यासोबत ३-४ लोक होते. आचारी मिळाला नाही म्हणून स्वयंपाकसुद्धा त्यांनीच केला होता. रात्री वस्तीतील लोक परत आल्यावर बैठक घेऊ असं ठरलं. परंतु रात्री १० पर्यंत दोन्ही वऱ्हाडं आली नाहीत. गावात होते त्याच लोकांना आम्ही रात्री माहिती दिली व नंतर सोबतच्या लोकांसाठी कुमार शिराळकरांनी 'अनाहिलेशन ऑफ कास्ट'वरती चर्चा घेतली. आमच्यासोबत गोव्याहून डॉ. रुपेश पाटकर तीन लोक सोबत घेऊन आले होते. मुंबईहून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सचे विद्यार्थी सोबत होते. रात्री समाज मंदिरामध्ये आमचा मुक्काम होता. दुसऱ्या दिवशी सकाळी संपूर्ण गावात मार्च काढला. प्रत्येक दलिताच्या घरात पत्रके वाटली. बौद्ध, मातंग, चर्मकार, वडार वस्ती पिंजून काढली. लोकांना लाँग मार्चची माहिती दिली. जागृती जथ्था चौक-चौकामध्ये गाणे गात होता. घोषणा दिल्या जात होत्या. दत्तात्रय कांबळेला विचारले, 'तुमच्या गावामध्ये काही जातीय अत्याचाराचं प्रकरण घडलं आहे का?' त्यांनी उत्तर दिलं, 'आमचं गाव चागलं आहे. तसं काही या गावामध्ये नाही.' बौद्ध, मातंग वस्ती, वडार वस्तीमध्ये गेलो. त्यांचे राहणीमान बघता लक्षात येत होतं की गावामध्ये झालेला विकास समान नव्हता. काही लोकांच्या घरांचा अपवाद वगळता सर्वांची घरं अगदी सामान्य, लहान. वडार समाजाची परिस्थिती फारच वाईट. वडारवस्तीमध्ये एक व्यक्तीसमोर आला व म्हणाला,

'माझी जमीन बळकावली आहे. गावातील सवर्णांनी मला जिवे मारण्याची धमकी दिली आहे.' आमच्या सोबत असलेला एफटीआयचा अक्षय कॅमेरा घेऊन आला होता. तो सर्वांचे अनुभव टिपत होता. याची एक डॉक्युमेंटरी व्हावी असं तो म्हणतो. भिल्ल समाजाचे लोक भेटले. मासेमारी करतात. अजून सामाजिक, आर्थिक स्तरामध्ये प्रगती नाही.

**थेऊर**

लोणी काळभोरहून पुढे सकाळी आम्ही थेऊरला पोहोचलो. गावाच्या वेशीवर सिद्धार्थ कांबळे व मारुती कांबळे यांनी आमचं स्वागत केलं. त्यांच्यासोबत आलेल्या कार्यकर्त्यांसोबत थेऊर गावामध्ये मार्च गेला. नंतर दलित वस्तीमध्ये. तिथे समाज मंदिरामध्ये बैठक. वस्तीतील सर्व तरुण, वृद्ध, महिला जमा झालेल्या. थेऊर गावातील भिल्ल वस्तीतील लोकसुद्धा बैठकीला आले. सर्वांचे मनोगत झाले. लाँग मार्चची माहिती दिली. थेऊर

**(पुढील मजकूर पान २५ वर)**

(पान ९ वरून)

# दलित अत्याचार, लाँग मार्च आणि खर्डा संसद

गावामध्ये सवर्णांनी दलितांवर काही वर्षापूर्वी गोळीबार केला होता. सिद्धार्थ कांबळे याला मारहाणसुद्धा केली होती. या प्रकरणामध्ये आता तो एकटाच हे प्रकरण लावून धरत आहे. बाकीचे शांत झाले आहेत. सिद्धार्थ थेऊरच्या गणपती मंदिराच्या परिसरामध्ये फुलं विकण्याचा व्यवसाय करतो. आरोपी धनदांडगे आहेत. बागायती शेतकरी आहेत. संघर्ष चालू आहे.

**यवत**

२३ मे २०१४ चा मुक्काम यवत येथे होता. यवतच्या कार्यक्रमाची व मुक्कामाची जबाबदारी उत्तमराव गायकवाड व सावंत सर यांनी घेतली होती. सर्व प्रथम दलित बौद्ध वस्तीमध्ये आम्ही गेलो. तेथे समाज मंदिरापासून घोषणा देत गावामधून आम्हाला उत्तमरावांनी मुख्य बाजारामध्ये आणले. त्या दिवशी आठवडी बाजार होता. बाजार संपल्यानंतर तिथेच जाहीर सभा घेण्यात आली. आमच्या घोषणांनी व जागृती जथ्थ्याच्या गाण्यांनी भरपूर लोक जमा झाले होते. जाहीर सभा घेण्यात आली. दौंडचे आमदार एका दुकानात बसून सभा ऐकत होते. उत्तमराव गायकवाड हे भारिप बहुजन महासंघाचे तालुकाध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते. त्यांनी प्रस्तावनेत नमूद केलं की काही वर्षापूर्वी त्यांच्यावर हल्ला झाला. त्यांची गाडी पेटवून देण्यात आली. त्यांची केस अजून चालू आहे. २२ मे रोजी सकाळी चर्मकार समाजातील एका व्यक्तीला गावातील ५ सवर्ण व्यक्तींनी बेदम मारहाण केली. तो व्यक्ती पुण्यामध्ये आज मृत्यूशी झुंज देत आहे. आरोपींना अजून अटक झाली नाही. गावातील एकही सवर्ण व्यक्ती त्या कुटुंबाला भेटायला गेला नाही. आमदार हे सर्व ऐकत होते. आरोपींवर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुढाऱ्यांचा वरदहस्त आहे, असेही उत्तमराव म्हणाले. या सभेमध्ये लाँग मार्चची भूमिका मांडत असताना हेसुद्धा सांगितले की, मागील २० दिवसांमध्ये ८ दलित, आदिवासी व मुसलमान व्यक्तींचा खून महाराष्ट्रामध्ये झाला आहे. दोन जण पोलिस कोठडीमध्ये मृत्यू पावले आहेत. या सर्वांविरूद्ध संघटित आवाज बुलंद करणं गरजेचे आहे. मागील ६५ वर्षामध्ये युद्धामध्ये जितके लोक मारले गेले नाहीत, त्याच्याहून जास्त लोक जातीय अत्याचारामध्ये मारले गेले आहेत. सभा संपवून आम्ही विश्रामगृहात गेलो. तिथे एका खोलीमध्ये आमच्या राहण्याची व्यवस्था केली होती. एकूण ४० लोक होते. पुरुष मंडळी पटांगणात झोपली, तर महिलांची खोलीमध्ये व्यवस्था केली होती. उत्तमरावांना पीडित चर्मकार कुटुंबाशी भेटण्याबद्दल बोललो. परंतु घरी आता कोणी नाही. सर्व लोक पुण्याला हॉस्पिटलमध्ये गेले आहेत असे कळाले.

**वरवंड - पाटस**

पुढचं गाव होतं वरवंड. वरवंडमध्ये आमचा पूर्वी काही संपर्क झाला नव्हता. म्हणून केशव वाघमारे सकाळीच या गावामध्ये गेले. तिथल्या स्थानिक कार्यकर्त्यांसोबत बोलले. आम्ही वरवंडमध्ये पोहोचेपर्यंत संपूर्ण दलित वस्ती आमच्या स्वागतासाठी गावाच्या वेशीवर हजर होती. घोषणा देत लाँग मार्च गावातून दलित वस्तीत शिरला. तिथे समाज मंदिरात कार्यक्रम होता. गावातील तरुण मुलं, मुली व वयोवृद्ध मंडळी जमली होती. गावातील सवर्ण वस्तीमध्ये पक्के रस्ते, स्वच्छता होती. दलित वस्तीमध्ये अस्वच्छता होती. कच्चा रस्ता होता. घरे छोटी होती. आमची भूमिका मांडल्यानंतर महाराष्ट्रातील जातीय अत्याचाराचं प्रमाण वाढत आहे असं नमूद केलं. गावकऱ्यांना विचारलं, 'तुमच्या गावात काय परिस्थिती आहे?' एक गृहस्थ म्हणाले, ''आमच्या गावात तसा भेदाभेद काही नाही. जर आपल्या मुलाने मराठ्यांची पोरगी काढली तर वाद होणारच. आपल्या जातीमध्ये काय शिकलेल्या मुली नाही आहेत? मग कशाला मराठ्याची मुलगी करायची? भांडण तर होणार जर तुम्ही त्यांची मुलगी काढली तर. आमच्या गावामध्ये असा प्रकार नाही.'' आजोबांच्या या वाक्यानंतर बैठकीमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली. आजोबा एकीकडे व संपूर्ण सभागृह दुसऱ्या बाजूला. म्हणजे पायरीने रहाल तर वाद होणार नाही, असं म्हणायचं आहे का तुम्हाला? असा प्रतिवाद गावातील एका तरुणाने केला. मध्यस्थी करून चर्चा शांत करावी लागली. प्रियदर्शी तेलंग म्हणाले, ''बाबा, तुमच्या गावामध्ये मारहाण कोणाला झाली नसेल परंतु सवर्णांच्या वस्तीमध्ये व तुमच्या वस्तीमध्ये एवढा फरक का आहे? ग्रामपंचायतीचा विकासाचा पैसा समान खर्च होतो का?'' या प्रश्नाबरोबर सर्व मंडळी म्हणाली, 'गावातील सर्व सांडपाणी दलित वस्तीमध्ये वळवलं आहे. संडासाचं पाणी सुद्धा आमच्या वस्तीमध्ये येतं. नाला उघडा आहे आणि पुढे वाहतसुद्धा नाही. संपूर्ण वस्तीमध्ये दुर्गंधी पसरली आहे. तक्रार करून सुद्धा कोणीच याची दखल घेत नाही.' वस्तीमधून वाहणारा नाला त्यांनी दाखवला. यामुळे रोगराई वस्तीमध्ये पसरते, विकासाचं एकही काम दलित वस्तीमध्ये होत नाही, असं त्यांनी आम्हाला सांगितलं. गावातील लोकांनी आम्हाला परत गावामध्ये येण्याचं आमंत्रण दिले व २८ तारखेला खर्ड्याला येण्याचं आश्वासन दिलं.

वरवंडनंतर दुपारचे जेवण पाटसला होते. दुपारची बैठक पंचशीलनगर, पाटस येथे होती. अशोक पानसरे यांनी बैठकीची तयारी केली होती. गावातील सर्व मंडळी जमा झाली होती. पाटसमधले बरेचसे लोक पुण्यात काम करतात. जे गावामध्ये होते त्यात कॉलेजमध्ये शिकणारी तरुण, महिला व वयस्कर मंडळी जास्त. राजकारणामध्ये होणाऱ्या दलित राजकारणाच्या दुर्दशेला कंटाळून अनेक लोक अराजकीय व धार्मिक कार्यात गुंतले होते. आम्ही जेव्हा दलितांवर होणाऱ्या अत्याचाराचा पाढा वाचला तेव्हा एक वयस्कर व्यक्ती म्हणाली,

''आता पुन्हा पँथरसारख्या संघटनेची गरज आहे. चळवळीचा धाक राहिला नाही. म्हणून अत्याचार वाढले आहेत. चळवळीचा धाक निर्माण करा.'' महिला मोठ्या संख्येने बैठकीला जमा होत्या. पुण्याहून बैठकीसाठी निखिल गायकवाड व अजित पानसरे पाटसला आले होते. पाटस हे अजित पानसरेंच गाव. जेवणाची व्यवस्था त्यांनीच करून दिली होती.

**दौंड**

पाटसहून आम्ही दौंडकडे निघालो. दौंडमध्ये प्रा. भीमराव मोरे यांनी बैठक व राहण्याची व्यवस्था केली होती. त्यांची पत्नी दौंड

नगरपरिषदेमध्ये नगरसेविका आहे. प्रा. मोरे यांचा सामाजिक कार्यात दबदबा. दौंड येथील आंबेडकर पुतळ्याजवळ प्रा. मोरेंनी आमचे स्वागत केले. संध्याकाळी ६ वाजता पुण्याहून लोकायतचे ७-८ लोक आम्हाला येऊन सामील झाले. मग लाँग मार्च संपूर्ण दौंड शहरामध्ये फिरला. चौका-चौकात जागृती गीते म्हणायची व लाँग मार्चचे प्रयोजन लोकांना सांगायचे. घोषणा देत दुसऱ्या चौकात जायचं. संपूर्ण दौंड शहरामध्ये चर्चा सरू झाली. पत्रकार येऊन आम्हाला भेटले. रात्री ८ वाजता भीमनगर येथील सभागृहामध्ये जाहीर सभा झाली. किरणताई, केशव वाघमारे व इतरांनी मते मांडली. केशव वाघमारे यांनी महाराष्ट्रामध्ये घडणाऱ्या अत्याचारांचा आढावा घेतला. आपण सर्व लोक इतिहासामध्ये रमतो व वर्तमानाकडे डोळेझाक करतो. आपण असेच वागत राहिलो तर आपला भविष्यकाळ काही उज्ज्वल राहणार नाही. दौंड शहरामध्ये अनुसूचित जातींची संख्या भरपूर आहे. रेल्वे जंक्शन असल्यामुळे नोकरीसाठी आलेल्यांची संख्या सुद्धा अधिक. दौंड नगरी बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. याचा दौंडकरांना अभिमान म्हणून सर्वच लोक इतिहासात रमणारे व पुढारी सत्ताधाऱ्यांच्या दावणीला बांधलेले. केशव वाघमारे यांचे भाषण सर्वांच्या डोळ्यामध्ये अंजन घालणारे ठरले.

**काष्टी**

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही काष्टी गावाकडे चालायला लागलो. काष्टीमध्ये पूर्वतयारीसाठी केशव वाघमारे व अभिषेक भोसले पुढे गेले होते. रस्त्यामध्ये सुनिता भोसले १५-२० पारधी समाजातील कार्यकर्त्यांसोबत भेटल्या. त्याही आमच्यासोबत चालू लागल्या. काष्टीमध्ये प्रवेश करताच श्रीगोंदा पोलिस स्टेशनचे पीआय आम्हाला भेटले. आमचा मार्ग व कार्यक्रम विचारला व आमच्यासोबत पाच-सहा पोलिसवाले चालू लागले. काष्टी येथे बाजारामध्ये जाहीर सभा होती. वडगाव रसाई या गावातील ५०-६० महिला काष्टी येथे सभेला आल्या होत्या. या सर्व महिला महाराष्ट्र राज्य शेतमजूर संघटनेच्या होत्या. श्रीगोंद्याहून जालिंदर घोडके आले होते. जाहीर सभा झाली. दलित सोडले तर गावातील लोक दुरूनच सर्व बघत होते. पोलिस प्रत्येक भाषणाचं व प्रत्येक हालचालीचं व्हीडीओ रेकॉर्डिंग करीत होते. भाषणामध्ये जालिंदर घोडके यांनी दलित अत्याचाराच्या निषेध करता करता शालिनीताई पाटलांवर ताशेरे ओढले. डॉ. दाभाडे व केशव वाघमारे यांनी सविस्तर भूमिका मांडल्यानंतर जालिंदरतात्या बोलले होते. शेवटी संघटनेतर्फे स्पष्टीकरण करावे लागले की फुले, शाहू, आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या व्यक्तीला अशी भाषा शोभत नाही. स्त्रियांचा अपमान करणाऱ्या विधानाचं दलित आदिवासी आंदोलन समर्थन करत नाही. आमची लढाई जातपितृसत्तेविरूद्ध आहे. जातीव्यवस्थेचा अंत स्त्रीदास्य अंतातून होणार आहे. स्त्रियांचं दास्य हे जातिव्यवस्थेचं मूळ आहे म्हणून आमच्या व त्यांच्या स्त्रिया असा भेद करता येणार नाही. सर्व स्त्रिया या जातीव्यवस्थेच्या बळी आहेत. सभा संपल्यावर आम्ही पुन्हा गावामधून रॅली काढली. घोषणा दिल्या व लिंपणगावच्या मार्गाला लागलो. अर्ध्या रस्त्यापर्यंत वडगाव रसाईवरून आलेल्या महिला आमच्यासोबत चालल्या. मोलमजुरी करणाऱ्या त्या महिलांनी जात असताना लाँग मार्चसाठी आम्हाला ६०० रुपये दिले. एका खांद्यावर लाल झेंडा व एकावर निळा झेंडा घेऊन या महिला आमच्यासोबत आल्या होत्या. रोजंदारीवर काम करणाऱ्या या शेतमजूर महिलांनी दिलेल्या देणगीने आम्ही सर्वच शहारून गेलो होतो.

**लिंपणगाव**

लिंपणगावच्या १-२ किमी अलिकडे मोकळ्या जागेमध्ये पारधी, भिल्ल, दलित व मुसलमानांची पालं आहेत. लिंपणगावच्या भारत शिंदे यांनी येथेच आमच्या बैठकीची व जेवणाची सोय केली होती. या जागेवर पूर्वी २०१२ साली लिंपणगाव येथील सवर्ण लोकांनी हल्ला करून सगळी पाले जाळून टाकली होती. त्यामध्ये या सर्व लोकांची ओळखपत्रे, रेशनकार्ड, मतदार कार्ड जळून खाक झाले. सरकारने अजून त्यांना दुसरे ओळखपत्र किंवा रेशनकार्ड दिलेले नाही. जवळपास पाण्याची सोय नाही. पाणी आणायला १ कि.मी. दूर जावे लागते. वीज पुरवठा नाही. आता तर ग्रामपंचायतीने त्यांना या जागेवरून काढून टाकण्याचा ठराव मंजूर केला आहे. पालावरचं एकही मूल शाळेमध्ये जात नाही. शाळा गावामध्ये आहे. गावात जाण्याची त्यांची हिंमत नाही. ही सर्व हकीकत आम्हाला लोकांनी सांगितली. अलमभाई मुलाणी यांच्या झोपडीसमोर थोडी सावली केली होती. तेथेच आम्हाला जेवण दिले. जेवणामध्ये कोंबडं होतं. विचारले 'एवढा खर्च कशाला?' जेवणारे ५० जण लोक होते. अलमभाई म्हणाले, 'पालावरच्या लोकांनी पैसे जमा करून हा खर्च केला आहे. गावामध्ये न थांबता तुम्ही आमच्या पालावर थांबतात याचाच आम्हाला आनंद आहे.' पालावरती केलेल्या एका जेवणाने सर्व पारधी, आदिवासी, मुसलमान सहभागी असल्याची भावना तयार झाली. आमच्यासोबत आलेले विद्यार्थी त्यांचं जीवन बघून हादरून केले. रोजच जगण्याचा संघर्ष, आपण या देशाचे नागरिक आहोत याची नोंद कोणत्याच सरकारी दप्तरात नाही. जर कोणत्या सरकरी दप्तरात आपली नोंद असेल तर ते पोलिस स्टेशनच्या एफआयआर मध्ये. २०२० मध्ये महासत्ता होण्याचं स्वप्न पाहणाऱ्या या देशामध्ये अजून हा समाज आदिम अवस्थेमध्ये जगत आहे. स्वातंत्र्याचे सूर्यकिरण अजून यांच्यापर्यंत पोहोचलेच नाहीत. २०१२ साली यांची पालं जाळली त्याची वेगळी केस चालू आहे. परंतु यांना घरकुल योजनेमधून घर बांधून द्यावीत, ते राहतात त्या जमिनी त्यांच्या नावावर कराव्यात, या मागण्या सरकारदरबारी २०१२ पासून पडून आहेत. प्रातांनी आदेश देऊनही तलाठी मोजमाप करत नाही. यांचा प्रश्न निकाली लागत नाही. कॉ. कुमार शिराळकर व आम्ही लाँग मार्च झाल्यानंतर पुन्हा या गावामध्ये येऊन या लोकांचा प्रश्न सोडवायचा हे निश्चित केले. पालावरील सर्व लोकांना आम्ही गावाच्या वेशीपर्यंत आमच्यासोबत चालण्याचा आग्रह केला. या सर्व मंडळींना घेऊन आम्ही लिंपणगावामध्ये शिरलो. घोषणा देत, गाणी गात, गावातील सवर्ण वस्ती, दलित वस्ती पिंजून काढली. काही लोकांनी कुतूहलाने खिडक्या उघडल्या तर काहींनी द्वेषाने त्या बंद केल्या. संपूर्ण गावामधून रॅली काढल्यानंतर या मंडळींना परत जायला सांगितले व आम्ही पुढे श्रीगोंद्याला निघालो.

**श्रीगोंदा**

श्रीगोंद्याचं नियोजन जालिंदर घोडके यांच्याकडे होते. जालिंदर घोडके तालुक्यामध्ये धम्मप्रचार करतात. लोकप्रबोधन, लोकशिक्षण करण्याचा ध्यास, परंतु सर्व काही एकटेच करणार.

सकाळपासून जालिंदर आमच्यासोबत. आज मुक्काम श्रीगोंद्याला. तिथे रात्रीची बैठक. श्रीगोंद्यामध्ये प्रवेश करताच सम्राटचे पत्रकार चंदन घोडके भेटलले. त्यांनी श्रीगोंद्यातील बाकीच्या पत्रकारांना जमा केले होते. विश्रामगृहामध्ये पत्रकार परिषद झाली. पत्रकार परिषदेमध्ये जामखेडमध्ये निघालेल्या प्रतिमोर्चाबद्दल विचारलं. तुमचा लाँग मार्च समाजामध्ये तेढ निर्माण करण्यासाठी आहे, असा आरोप मराठा संघटना करत आहेत, असेही विचारले. आम्ही सांगितले, ''हा लाँग मार्च कोणाही एका जातीविरूद्ध नाही. हा लाँग मार्च न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी आहे. या मार्चमध्ये अनेक जातीचे व धर्माचे लोक आहेत. हा जरी दलित व आदिवासींच्या हक्कांसाठी काढलेला असला तरी या मार्चमध्ये सहभागी व्यक्ती सर्व जाती, धर्मातील आहेत. विरोध करणाऱ्या संघटनांनी एकदा स्पष्ट करावं की ते जातीच्या बाजूने आहेत का न्यायाच्या?''

श्रीगोंदा शहरामध्ये घोषणा देत आम्ही रॅली काढली. आमचा मुक्काम दलित वस्ती शेजारील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या पटांगणात होता. तिथेच बैठकसुद्धा होती. रात्रीचे ८ वाजले तरी लोक बैठकीला जमा झाले नव्हते. जालिंदर घोडके सकाळपासून आमच्या सोबत असल्यामुळे तिथे बैठकीची तयारी कोणीच केली नव्हती. शेवटी आमच्या सोबतच्या मुलांनीच वस्तीमध्ये जाऊन दवंडी ठोकली. लोकांना बैठकीला आमंत्रित केले. बघता बघात १००-१५० लोक जमा झाले. मी लाँग मार्चची भूमिका व उद्देश सांगितला. कॉ. शिराळकर, प्रियदर्शी तेलंग व इतरांनी मांडणी केली.

**वालवड**

वालवड गावामध्ये आमचा पूर्वी संपर्क झाला नव्हता. कोणीही व्यक्ती पूर्वपरिचयाची नव्हती. सर्वजण गावात गेलो. विचारलं दलित वस्ती कोठे आहे? रस्त्यावरच एक समाज मंदिरासारखी वास्तू दिली. परंतु त्यावर 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कार्यालय' असा बोर्ड होता. काही दलित लोक आजूबाजूला भेटले. त्यांना सांगितले, आम्ही पुण्याहून आलो आहोत. खर्ड्यापर्यंत हा मार्च आहे. गावातील लोकांसोबत काही बोलायचं आहे. गावामध्ये रॅली काढली. बौद्ध वस्ती, मातंग वस्ती, वडार वस्ती येथे घरोघरी जाऊन लोकांना बैठकीला बोलावलं. तीनही वस्तीतील लोक आमच्या बोलवण्यावर आले. बैठक सुरू झाली. सर्वांना लॉग मार्चचे प्रयोजन, खर्ड्यातील घटना, वाढते अत्याचार याची माहिती दिली व नंतर विचारले, 'आपल्या गावामध्ये काय परिस्थिती आहे?' लोक सांगू लागले. आमच्या गावामध्ये परीट व मराठा समाज आहे. आमच्या स्मशानभूमीची जमिन परीट समाजाने बळकावली आहे.'

एक महिला म्हणाली, ''वर्षाला फक्त तीन महिने रोजगार हमीचे काम मिळते. परंतु सवर्णांच्या घरामधल्या लोकांना ६ महिने काम देतात. त्यांना जमीन आहे तरी त्यांना जास्त काम मिळतं, आम्हाला नाही. मी आणि माझा नवरा रोजंदारीवर जगतो. वर्षातून फक्त ३ महिने आम्हाला काम मिळतं.''

त्यांना विचारले, ''ग्रामसभा होते का?'' तर उत्तर मिळाले, ''ग्रामसभेमध्ये प्रश्न विचारला म्हणून मारलं. पोलिसांकडे तक्रार करायला गेलो तर तक्रारसुद्धा घेतली नाही. गावामध्ये तीन विहिरी आहेत. महार समाजाच्या विहिरीवर ग्रामपंचायतीने मोटर बसवली आहे. त्याचं पाणी सर्व गाव पितं. परंतु जेव्हा या विहिरीला पाणी येत नाही तेव्हा मराठ्यांच्या विहिरीवर आम्हाला पाणी भरू दिलं ज्ञात नाही. तुम्ही लोक मटन खाता, तुम्ही आमची विहीर बाटवू नका असं बोलतात. आमच्या विहिरीचं पाणी पितात तेव्हा हे बाटत नाहीत. आम्ही त्यांच्या विहिरीचं पाणी घेतलं की बरी यांची विहीर बाटते?'' असा प्रतिप्रश्न त्या महिलेने केला. 'गावामध्ये यांची दहशत आहे, हे आम्हाला मारतात, पोलिस तक्रार घेत नाहीत', या तक्रारी आम्हाला जमलेल्या लोकांनी सांगितल्या. वडार समाजाची एक महिला तिच्या वडिलांसमवेत आली होती. ती म्हणाली, 'माझा नवरा गेला आहे. मला सरकारची पेंशन मिळत नाही. मला तुम्ही मदत करा.' या गावामध्ये परिस्थिती अजून भयंकर. गावात पाणी नाही, सर्व शेती कोरडवाहू, सवर्णांकडे प्रत्येकी २०-२५ एकर शेती तर दलितांकडे फक्त शेतमजुरी. कोरडवाहू शेतीमध्ये काही एक उत्पन्न नाही. म्हणून रोजंदारीच्या योजनेमध्ये मिळणाऱ्या पैशामध्ये सर्वांचं जिणं. सरकारी योजनेमध्येसुद्धा जातीव्यवस्था कार्यरत असते. उच्चनीचता काम करते. या सर्व लोकांचा निरोप घेऊन आम्ही कर्जतकडे निघालो.

**कर्जत**

कर्जतमध्ये भास्कर भैलुमे व सोमनाथ भैलुमे यांनी जबाबदारी घेतली होती. भास्कर हे २६ तारखेला अहमदनगरला होते. एकट्या सोमनाथ भैलुमे यांनी सर्व जबाबदारी पार पाडली. गावामध्ये आम्ही लाँग मार्च नेला. सर्व वस्तीमध्ये मार्च नेला. कर्जतमध्ये आम्हाला नितीन आगेच्या मावशी भेटल्या. त्यांना कळालं होतं की, लाँग मार्च पुणे ते खर्डा निघाला आहे व आज मुक्काम कर्जतमध्ये आहे. त्या भेटायला आल्या. स्वत:हून परिचय करून दिला. त्यांना विचारले, ''शेवटचं नितीनला केव्हा भेटलात?'' परीक्षा झाल्यावर १४ एप्रिला नितीन कर्जतला मावशीकडे आला होता. १०-१२ दिवस राहिला अन् गेला. हीच शेवटची भेट. म्हटलं, ''तो या पोरीबद्दल काही बोलला का?'' 'तसं काहीच बोलला नाही. किंवा त्याचं वागणं काही वेगळं वाटलं नाही.' म्हटलं, ''तुम्हाला नितीनच्या खुनाचं केव्हा कळालं?'' ''२८ एप्रिलला संध्याकाळी ५ वाजता भाऊजींचा फोन आला.'' त्यांचं सांत्वन कसं करावं, कोणालाच कळत नव्हतं.

**जामखेड**

प्रत्येक गावामध्ये एखादी तरी जातीय अत्याचारी केस आम्हाला ऐकायला मिळत होती. सर्वच गावांमध्ये नितीन आगेचा खून झाला व त्यानंतर जामखेडमध्ये प्रतिमोर्चा निघाला याचा राग होता.तरुण मुलं गाड्या करून खर्डा संसदेस येण्यास तयार होती. खर्डा संसद कशासाठी? या देशाच्या संसदेमध्ये, राज्याच्या विधानसभेत दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक यांचे प्रश्न चर्चिले जात नाहीत. म्हणून आम्ही आमची संसद भरवणार. त्याच खर्डा गावामध्ये जेथे जातीयवाद्यांनी नितीनचा खून केला आहे. ही संसद पुढील जनआंदोलनाची दिशा ठरवणार आहे.

आज २७ तारीख. उद्या खर्डा संसद. संपूर्ण महाराष्ट्रातून लोक येणार. सरकार आमच्या प्रत्येक घडामोडीकडे बारकाईने लक्ष देऊन होते. पुण्याहून प्रा. विलास वाघ व वसंत साळवे जामखेडला पोहोचले होते. मुंबईहून कॉ. सुबोध मोरे ५० सिटर बस करून

आम्हाला सकाळीच येऊन भेटले. आमच्यासोबत लॉंग मार्चमध्ये सहभागी झाले. महाराष्ट्रातून लोक निघण्याच्या तयारीला. दुपारी ३.३० वाजता अरुण जाधव यांच्या कार्यालयात कर्जतच्या एसडीएमचा फॅक्स आला. मुंबई पोलीस ॲक्ट १९५२ च्या अंतर्गत तुम्हाला खर्डा गावामध्ये कार्यक्रम घेण्यास परवानगी नाकारण्यात येत आहे. अरुण जाधवने परवानगीसाठी अर्ज फार पूर्वीच केला होता. परंतु कार्यक्रमाच्या एक दिवसा अगोदर प्रशासनाने फॅक्स करून कळवले की परवानगी नाकारली आहे. लोक खर्ड्याला जाण्यासाठी निघाले होते. अरुणने फोन केला. फॅक्स आल्याचे सांगितले. मी म्हटले, संध्याकाळी जामखेडमध्ये आल्यावर बोलू. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सच्या प्राध्यापिका बेला भाटिया मुंबईहून कर्जतमध्ये सकाळी लॉंग मार्चमध्ये सहभागी होण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी प्रत्येक गावामध्ये महिलांसोबत संवाद साधला.

प्रा. विलास वाघ व वसंत साळवे आम्हाला भेटायला पाटोद्याला आले. आमच्यासोबत जामखेडला पोहोचले. जामखेडला आम्ही संध्याकाळी ६ वाजता पोहोचलो. विश्रामगृहाशेजारील गणेश मंगल कार्यालयामध्ये आज मुक्काम होता. नांदेडवरून अविनाश जोंधळे, कनिष्क सोनसळे व इतर मंडळीसुद्धा पोहोचली. थोड्याच वेळात आम्हाला सर्वांना फोन येऊ लागले. खर्डा संसदेला परवानगी नाकारली आहे. उद्या संसद होणार आहे का? आयबीएन लोकमतवर स्ट्रिप चालू आहे- 'खर्डा संसदेला परवानगी नाकारली.' निघालेल्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. आम्ही आयबीएन लोकमतला फोन लावून कळवले की, आपण अर्धीच बातमी देत आहात. खर्डा संसदेला परवानगी नाकारली, परंतु खर्डा संसद होणार... कार्यकर्त्यांचा निश्चय... अशी स्ट्रिप लावा. आमच्या म्हणण्यानुसार आयबीएन लोकमतने स्ट्रिप चालवली. २८ तारखेला सकाळी वृंदा करात दिल्लीहून येणार होत्या. त्यांना खर्ड्याला आणण्यासाठी किरणताई मोघे पुण्याला गेल्या होत्या. त्यांनी पुण्याहून प्रेस रीलिज दिले. खर्डा संसद होणार. संध्याकाळी ८ च्या सुमारास कर्जतचे डीवायएसपी धीरज पाटील, खर्डा पोलिस स्टेशनच्या पीआय सोबत आमची भेट घेण्यासाठी आले. अरुण जाधवने त्यांना गणेश मंगल कार्यालयामध्ये बोलवले. आम्ही सर्व कार्यकर्ते सतरंजी टाकून खाली बसलेलो होतो. पोलिस अधिकाऱ्यांनाही तिथे बसवले. सगळी तरुण मंडळी आजूबाजूला उभी होती. चर्चा सुरू होताच सर्वांनी मोबाईलमधले व्हिडीओ रेकॉर्डिंग चालू केले. यामुळे डीवायएसपी पाटील थोडे डिस्टर्ब झाले. (रात्री मुलांना विचारले, 'तुम्ही चर्चेचे व्हिडीओ रेकॉर्डिंग का केलेत?' त्यावर मुलांनी उत्तर दिले, ''आपल्या प्रत्येक बैठकीचे व्हिडीओ रेकॉर्डिंग पोलिसांनी केले. जेवण करताना सुद्धा रेकॉर्डिंग केले. त्यांना कळू दे व्हिडीओ रेकॉर्डिंग चालू असताना सुद्धा न घाबरता आपला मुद्दा कसा मांडायचा असतो.'')

डीवायएसपी म्हणाले, ''आपल्याला नितीन आगेच्या खुनाच्या केसची माहिती देण्यासाठी आलो आहोत. तसेच उद्याच्या कार्यक्रमासंबंधात चर्चा करण्यासाठी आलो आहोत. नितीन आगेच्या खुनाचा तपास योग्य दिशेने चालू आहे. आरोपींना अटक केली आहे.'' आम्ही विचारले, ''चार्जशीट फाईल झाली का?'' उत्तर नाही. ''मुलीचा जबाब घेतला का?'' ''तपासाच्या काही गोष्टी सांगता येणार नाहीत.'' मागच्या वेळेस जेव्हा खर्ड्याला आलो होतो तेव्हा अशीच उत्तरे होती.

खर्डा संसदेबद्दल पाटील म्हणाले, आपणास परवानगी नाकारण्यात आली आहे. मुंबई पोलिस ॲक्टचे कलम ३७ (१)(३) लावण्यात आले आहे. तुम्हाला उद्या खर्डा गावामध्ये कार्यक्रम घेता येणार नाही. एवढ्यात कॉ. सुबोध मोरे म्हणाले, ''तुम्ही दबावाखाली आमची परवानगी नाकारत आहात.'' ''माझ्यावर कोणाचाही दबाव नाही आहे.'' ''मग परवानगी का नाकारता?'' ''गावामध्ये आम्ही शांतता प्रस्थापित केली आहे ती भंग होईल.'' ''देशामध्ये जातीय राज्य नाही तर कायद्याचे राज्य निर्माण व्हावे म्हणून हा लॉंग मार्च आहे. तुम्हाला आमच्या कोणत्या कृत्यामुळे शांतता भंग होईल असं वाटतं?'' उत्तर नाही. ''ज्यांच्यामुळे शांतता भंग होणार आहे त्यांना ताब्यात घ्या. मी माझा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा व एकत्र जमण्याचा संवैधानिक हक्क बजावणार आहे. तो तुम्ही रोखू शकत नाही.'' यावर पाटील म्हणाले, ''तुमच्यामुळे समाजामध्ये तेढ निर्माण होईल.'' म्हटलं, ''आपण तर आम्हाला विरोध करणाऱ्या संघटनांची भाषा बोलत आहात.'' शेवटी त्यांना सांगितले, ''साहेब आम्ही उद्या खर्ड्याला संसद घेणार आहोत. प्रशासनाने आम्हाला फार उशीरा कळवले आहे. मुंबईच्या आय.जी. ऑफिसने आम्हाला संपूर्ण लॉंग मार्चसाठी परवानगी दिली आहे. उद्या लोक जमा होणार. कार्यक्रम होणार. पुढे काय करायचं हा आपला प्रश्न आहे.''

डीवायएसपी पाटील आणि त्यांचे सहकरी निघून गेले. वातावरणामध्ये तणाव होता. सोबतचे सर्व कार्यकर्ते चिंतित होते. बेला भाटिया माझाकडे आल्या व म्हणाल्या, ''आपल्यामुळे शांततेचा भंग होणार असेल तर अशा शांततेचा भंग झालाच पाहिजे.'' आम्ही खळखळून हसलो. जामखेड परिसरातील कार्यकर्ते भेटण्यास येत होते. पत्रकार येऊन गेले. सर्वांना आम्ही एकच सांगितले, ''कार्यक्रम होणार!'' रात्री मी, अरुण जाधव, कुमार शिराळकर, सुबोध मोरे, केशव वाघमारे, प्रियदर्शी तेलंग आणि डॉ. संजय दाभाडे यांची बैठक झाली. उद्या पोलिस आपल्याला अटक करू शकतात किंवा खर्डा गावामध्ये प्रवेश करू देणार नाहीत. मग काय करायचे? अटक एकट्याने नाही व्हायचे, सर्वांनी अटक व्हायचे, असं ठरलं. तसेच जर आपल्याला खर्डा गावामध्ये प्रवेशच करू दिला नाही तर जेथे असू तेथेच आपण 'सडक संसद' घ्यायची. परंतु कार्यक्रम करायचाच.

**अखेर खर्डा संसद झालीच!**

२८ मे ची सकाळ. सर्व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह होता. इतके दिवस चालूनही उत्साहात कोठेही कमी नव्हती. आज उत्साह दुप्पट झाला होता. सकाळपासून फोन येत होते. 'आम्ही निघालो आहोत. खर्ड्याला पोचतो.' दुपारी १ वाजता संसद भरणार होती. नियोजित स्थळावर स्टेज बांधून झाले होते. जवळपासच्या गावातील कार्यकर्ते पोहोचण्याच्या तयारीत होते. अनेकांच्या चेहऱ्यावर चिंता होती. आता पुढे काय होणार? पूर्वनियोजनाप्रमाणे सकाळी ९ वाजता जामखेडवरून निघून आम्ही १ वाजेपर्यंत खर्ड्याला पोहोचणार होतो. परंतु आम्ही निघण्याची वेळ बदलली. २८ तारखेलाच रिपब्लिकन सेनेचा मोर्चा तहसील कचेरीवर होता. आनंद आंबेडकर या मोर्चाचे नेतृत्व करणार होते. मोर्चा शेजारील विश्रामगृहापासून

निघणार होता. सकाळी ११ वाजता. जामखेडमध्ये पोलिस बंदोबस्त वाढला होता. राखीव पोलिस दलाच्या तुकड्या मागवल्या होत्या. सकाळी १०.३० वाजता एस. डी. एम. मिश्रा यांनी अरुण जाधवला चर्चा करण्यासाठी तहसील कार्यालयात बोलवले. आम्ही अरुणला जाऊ दिले नाही. आता मोर्चा निघणार, ही चर्चा करण्याची वेळ नाही. तुम्हाला ते तेथेच बसवून ठेवतील. जाऊ नका, असा सल्ला आम्ही दिला. सकाळी ११ वाजता गणेश मंगल कार्यालयापासून आम्ही खर्डा गावाकडे चालायला सुरुवात केली. आमच्या मागे हजार-दीड हजाराची गर्दी होती. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचा जयघोष करत, घोषणा देत आणि गाणी गात लॉंग मार्च खर्डा गावाकडे निघाला. हातात निळा व लाल झेंडा घेतलेल्या कार्यकर्त्यांनी जामखेडचा रस्ता फुलून गेला होता. संपूर्ण वाहतूक जाम झाली होती. वरती रखरखते ऊन, त्याच्याहून जास्त कार्यकर्त्यांचा उत्साह. कुठेही न थांबता लॉंग मार्च खर्डा गावापर्यंत पोहोचला. गावाच्या वेशीवर आगे कुटुंबियाचं घर. अनेक कार्यकर्त्यांनी आगे कुटुंबियांची भेट घेतली. त्यांचे सांत्वन केले. तेथून लॉंग मार्च कार्यक्रमाच्या स्थळाकडे निघाला. लॉंग मार्चने जेव्हा खर्डा गावामध्ये प्रवेश केला तेव्हा रस्त्याच्या दुतर्फा लोक उभे होते. आमच्याकडे कुतुहलाने पहात होते. डॉ. दाभाडेंनी त्यांना मार्चमध्ये सहभागी होण्यासाठी आवाहन केले. काही महिला आमच्या सोबत सहभागी झाल्या. त्यांचं पाहून अनेक ग्रामस्थ आमच्यासोबत चालू लागले. बायका म्हणाल्या, हे लोक आपल्यासाठी इतक्या दुरून चालत आले अन् आपण थोडं चालू शकत नाही का? आणि बघता बघता लॉंग मार्च कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचला.

लॉंग मार्चचे रुपांतर विराट सभेमध्ये झाले. घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. खर्डा संसदेला सुरुवात झाली. महाराष्ट्रातील अनेक मान्यवर आवर्जून खर्डा संसदेला आले होते. कार्यक्रमाचा अध्यक्ष मी होतो. खर्डा संसदेमध्ये भारत पाटणकर, गेल ऑम्वेट, मंगला खिंवसरा, युवराज मोहिते, शाम तांगडे, मनिषा तोकले, प्रा. विलास वाघ, वसंत साळवे, कॉ. कुमार शिराळकर, प्रियदर्शी तेलंग, डॉ. संजय दाभाडे, भाई वैद्य व वृंदा करात यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. संपूर्ण परिसर लोकांनी भरून गेला होता. लाल आणि निळे झेंडे घेतलेले कार्यकर्ते ४६ डिग्री तापमानात जमिनीवर बसून सभा ऐकत होते. शाम गायकवाड म्हणाले, डाव्यांनी व आंबेडकरवाद्यांनी पूर्वी केलेल्या चुका आता पुन्हा करू नका. लाल आणि निळा जातीच्या प्रश्नावर एकत्र आला आहे. ही एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. नितीन आगेचे आई-वडील सुद्धा विचारपीठावर होते. सोनईवरून २०० मेहतर समाजाचे युवक मोटरसायकलवरून खर्ड्याला आले होते. सोनईहून आलेला पंकज तन्वर म्हणाला, दीड वर्षांपूर्वी माझ्या भावाला सोनई येथे तुकडे करून मारून टाकले. त्याची केस अजून कोर्टामध्ये उभी राहिली नाही. सरकारी वकील एकही दिवस कोर्टामध्ये तारखेला आला नाही. जर माझ्या भावाला वेळेतच न्याय मिळाला असता तर आज नितीन आगेचा जीव गेला नसता. लोकांच्या मनामध्ये कायद्याची भीती राहिली असती. खून झाला तरी शिक्षा होत नाही अशीच लोकांची भावना आहे. नितीन आगेचे वडील बोलले, माझ्या मुलाला मरून आज एक महिना होतो. मला काही नको. फक्त आरोपींना शिक्षा झाली पाहिजे. मला न्याय मिळवून द्या.

वृंदा करात म्हणाल्या, महाराष्ट्र शासन दलित अत्याचाराच्या निपटारा करण्यासंदर्भात अगदीच उदासीन आहे. संपूर्ण देशामध्ये वाढणारा जातीय अत्याचार ही चिंतेची बाब आहे. जातीय अत्याचाराविरूद्ध संघर्षामध्ये आम्ही तुमच्यासोबत आहोत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या स्थळी राज्य राखीव दलाच्या अनेक तुकड्या तैनात होत्या. खर्डा संसदेने एकूण १८ ठराव पारित केले. ठरावांचं वाचन ॲड. मिलिंद सहस्रबुद्धे यांनी केले. हजारो लोकांच्या सहमतीने ठराव पारित झाले.

खर्डा संसद संपली. कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर विजयी भाव होते. गावातील स्थानिक मोठ्या संख्येने होते. बाहेरगावहून आलेले हजारो कार्यकर्ते होते. सर्वांना लवकरात लवकर गावाच्या बाहेर काढणे गरजेचे होते. कार्यक्रम संपल्यानंतर काही अनुचित प्रकार घडू नये याचीसुद्धा काळजी घेणे गरजेचे होते. आम्ही गाव सोडण्यापूर्वी सर्व कार्यकर्ते गावाबाहेर निघतील याची सर्व मंडळींनी काळजी घेतली. आलेले सर्व कार्यकर्ते मध्यरात्रीपर्यंत आपापल्या घरी पोहोचले. खर्डा संसद यशस्वी झाली.

लॉंग मार्च व खर्डा संसदेने काय साध्य केले? जातीचा प्रश्न महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चिला गेला. जातीचा प्रश्न कोणत्याच चर्चेमध्ये नव्हता. त्याची चर्चा लॉंग मार्चने घडवून आणली. ग्रामीण महाराष्ट्रामधील दलित, भटके, आदिवासी यांना एक नवा आत्मविश्वास दिला. सरकारला जातीय अत्याचारावर भूमिका घेण्यासाठी भाग पाडलं. लॉंग मार्च संपल्यानंतर अत्याचार पीडित अनेकांनी आमच्याशी संपर्क साधला, प्रश्न मांडले. लोक बोलू लागले, जातीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. मला वाटते जातीअंताच्या दिशेने पडलेले लॉंग मार्च व खर्डा संसद हे एक पाऊल आहे. रस्ता बिकट आहे परंतु सर्वांना सोबत घेऊन एक-एक पाऊल पुढे टाकत संघर्ष करण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय आमच्यासमोर नाही. ●

**डॉ. नितीश नवसागरे**
चलभाष : ९८५०९६२२७८

## व्यवस्थापक पाहिजे

आपल्या मासिकासाठी एका व्यवस्थापकाची नितांत आवश्यकता आहे. या कामात व्यवस्थापक म्हणून कार्यालयीन काम आणि आर्थिक व्यवहारांची देखभाल या जबाबदाऱ्या घेणं अपेक्षित आहे. इंग्लिश/मराठीतून पत्रव्यवहार, बँकिंगच्या कामाचा अनुभव, संगणकाशी दोस्ती या क्षमता अपेक्षित आहेत. 'मिळून साऱ्याजणी' या मासिकाच्या ध्येयधोरणाशी ओळख आणि सहमती असणाऱ्यांना इथे कामाचा आनंद निश्चित मिळेल. इच्छुक व्यक्तींनी साऱ्याजणीच्या कार्यालयात संपर्क साधावा.

**संपादक**